महानगरपालिका साकारतेय टाकाऊतून नवनिर्मिती

e Paper



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 25/11/2025 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 277 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# न्यायमूर्ती सूर्य कांत भारताचे 53 वे सरन्यायाधीश!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**दिल्ली : देशाचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी काल (२४ नोव्हेंबर) शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सूर्य कांत यांना सरन्यायाधीश पदाची शपथ दिली. न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्याकडे पुढील १५ महिने सरन्यायाधीशपदाचा कार्यभार असेल. मावळते सरन्यायाधीश भूषण गवई हे रविवारी (२३ नोव्हेंबर) सेवानिवृत्त झाले.त्यानंतर आता सूर्य कांत यांची सरन्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात आली आहे.**



सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून कलम ३७० रद्द करणे, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि नागरिकत्व हक्कांवरील प्रकरणांच्या सुनावणीत त्यांचा सहभाग होता.सूर्य कांत यांचा शपथविधी ऐतिहासिक ठरला आहे. कारण या शपथविधी सोहळ्याला सात देशांचे मुख्य न्यायमूर्ती उपस्थित होते.

भूतानचे मुख्य न्यायमूर्ती ल्योनपो नोरबू शेरिंग, केन्याच्या मुख्य न्यायमूर्ती मार्था कूमे, मलेशियाच्या संघीय न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती नलिनी पथमनाथन, मॉरीशसच्या मुख्य न्यायमूर्ती बीबी रेहाना मुंगली-गुलबुल, नेपाळचे मुख्य न्यायमूर्ती प्रकाश मान सिंह राऊत यावेळी उपस्थित होते.

सूर्यकांत हे सरन्यायाधीश पदावर ९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत राहतील. तब्बल १५ महिने त्यांच्याकडे हे पद असेल.सरन्यायाधीश सूर्य कांत यांचा जन्म १० फेब्रुवारी १९६२ रोजी हरियाणातील हिसार येथील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. १९८१ साली त्यांनी हिसार येथील शासकीय महाविद्यालयातून पदव्युत्तर पदवी संपादन केली.

१९८४ मध्ये त्यांनी रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठातून कायद्याची पदवी प्राप्त केली आणि हिसार येथील जिल्हा न्यायालयात वकिली सुरू केली.त्यानंतर १९८५ मध्ये ते पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयात वकिली करण्यासाठी चंदीगडला गेले. तिथे त्यांनी संवैधानिक, सेवा आणि दिवाणी बाबींमध्ये कौशल्य मिळवले.

# मतदार यादीवरील नागरिकांच्या हरकतींचे नियोजन करा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : आगामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचा मतदानाचा मूलभूत हक्क अबाधित राहण्यासाठी प्रत्येक मतदाराची नोंद बरोबर व अद्ययावत असणे अत्यावश्यक आहे. यासाठी नागरिकांची माहिती — नाव, पत्ता, वय, सुधारणा, नवीन समावेश आणि वगळण्यात आलेल्या नोंदी — यांची व्यवस्थित पडताळणी होणे आवश्यक आहे. यासाठी प्रारूप मतदार यादीच्या प्रक्रियेत नागरिकांच्या हरकती व सूचना प्रभावीपणे स्वीकारून त्या सोडविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त व प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.**



प्रारूप मतदार यादीवरील नागरिकांच्या हरकती व सूचनांचा आढावा बैठक आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात पार पडली. यावेळी आयुक्त हर्डीकर बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, सह आयुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मकरंद निकम, निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, स्मार्ट सिटीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजयराज यादव, सहाय्यक संचालक नगररचना प्रशांत शिंपी, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता बापू गायकवाड, उपायुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, सिताराम बहुरे, संदीप खोत, पंकज पाटील, अतुल पाटील, अमित पंडित, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, तानाजी नरळे, पूजा दूधनाळे, अश्विनी गायकवाड, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, प्रशासन अधिकारी सरीता मारणे, संगीता घोडेकर-बांगर, कार्यालय अधीक्षक रमेश यादव, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.आयुक्त हर्डीकर यांनी पुढे सांगितले की, प्रारूप मतदार यादीवरील नागरिकांच्या हरकती व सूचनांचे सूक्ष्म नियोजन ही निवडणूक प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. प्रत्येक नागरिकाचा मताधिकार प्रभावीपणे सुनिश्चित करण्यासाठी प्राप्त झालेल्या हरकती, दुरुस्त्या आणि सुधारणा मागण्यांचे काटेकोर विश्लेषण करून त्यावर तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे. संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून माहितीची पडताळणी, दस्तऐवजांची शहानिशा, पत्ता बदल, नाव दुरुस्ती आणि नवीन नोंदी यासह सर्व बाबींचे व्यवस्थित वर्गीकरण केल्यास मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत राहते. प्रारूप मतदार याद्यावरील नागरिकांच्या हरकती व सूचना योग्य रीतीने पार पाडण्यासाठी अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करा. या प्रक्रियेत पारदर्शकता, ठोस वेळापत्रक आणि नागरिकांशी सातत्यपूर्ण संवाद राखल्यास निवडणूक व्यवस्थेवरचा विश्वास अधिक दृढ होतो आणि लोकशाही प्रक्रियेची भक्कम पायाभरणी होईल. असे देखील आयुक्त श्रावण हर्डीकर म्हणाले.

**निवडणुक संबधित अन्य विषयांचा घेतला आढावा**

आगामी निवडणुकीच्या पाश्वभूमीवर स्ट्राँग रूम उभारणी, मतदार यादीतील दुबार नोंदणी हटवणे, मतदान केंद्रांची निश्चिती आणि आवश्यक ठिकाणी तात्पुरती मतदान केंद्रे उभारणे या बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. स्ट्राँग रूम सुरक्षेच्या उच्च मानकांनुसार उभारण्याचे निर्देश देण्यात आले असून मतदारांना मतदानासाठी कोणतीही अडचण येऊ नये, पारदर्शकता आणि सुरळीत निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. लवकरच मतदान केंद्राची स्वत: पाहणी करणार असल्याचे सांगत आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी मतदार केंद्र निश्चित करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 25/11/2025

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'च्या साक्षीने मतभेद विसरुन एकत्र या!

## आमदार महेश लांडगे यांचे आवाहन



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड - धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जगातील सर्वात उंच स्मारक 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'वरुन मागील काळात अनेकांनी राजकीय टीका केली. बिनबुडाचे आरोप केले. मात्र, जे मागे झाले ते सर्व आपण विसरुन सर्वांनी शहराच्या पर्यावरणावरील संकट दूर करण्यासाठी शंभूराजाच्या विचारांची एकत्र आले पाहिजे, असे आवाहन भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केले.**

आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र आणि डब्ल्युटीई फाउंडेशनच्या पुढाकाराने इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन-2025 चे आयोजन करण्यात आले. त्याला सायकलपटू आणि पर्यावरण प्रेमींचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना आमदार लांडगे बोलत होते.आमदार लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहरातील पर्यावरण आणि नदी संवर्धनासाठी सर्वांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी झाले- गेले विसरुन सर्वांनी एकत्र आले पाहिजे. 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'च्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडकरांनी संपूर्ण जगाला आदर्श निर्माण केला आहे. पवित्र कार्यावरुन राजकीय हेतुने कोणी खोटे आरोप केले, तर आम्ही खपवून घेणार नाही, असा गर्भीत इशाराही आमदार लांडगे यांनी दिला.इंद्रायणी नदी स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी विश्वविक्रमी "रिव्हर सायक्लोथॉन" 9 वे पर्व यशस्वीपणे पूर्ण करीत आहे. यावर्षी प्रथमच 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' च्या आवारात हा उपक्रम यावर्षीपासून घेणार आहोत. 'हिंदुभूषण' स्मारकाची उभारणी सुरू असताना अनेकांनी राजकारण आणि खोटे आरोप करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सर्वांनी एकत्र आले पाहिजे, असे साद आमदार लांडगे यांनी घातली.

**इंद्रायणी संवर्धनासाठी राज्य सरकार सकारात्मक...**

इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाच्यामाध्यमातून नदीला गतीवैभव देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे आणि सुमारे 600 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला आहे. आगामी 15 दिवसांत त्याची निविदा प्रक्रिया सुरू केली जाईल. प्रशासन आणि राज्य शासन नदी संवर्धनासाठी काम करीत आहे. मात्र, याला लोकचळवळ करण्यासाठी जनजागृती केली पाहिजे. तो संदेश आपण लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करीत आहोत. सलग 9 वर्षे सायकलपटू या मोहीमेत सहभागी होत आहेत. त्यांचे मनापासून आभार मानतो, असेही आमदार लांडगे म्हणाले.

# म्हाडा गृहनिर्माण सोसायटीच्या पाणीटंचाई वर तोडगा !

## प्रभागातील समस्या सोडविण्यासाठी डब्बू आसवानी ॲक्शन मोडवर



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी येथील म्हाडा गृहनिर्माण सोसायटी येथे बऱ्याच महिन्यांपासून रहिवाशी नागरिकांना पाण्याचा तुटवडा भासत होता. यामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. या सर्व समस्या सोडविण्याची मागणी तेथील रहिवाशी नागरिकांनी पिंपरी चिंचवड शहराचे मा. उपमहापौर हिरानंद उर्फ डब्बू आसवानी यांना केली.**

डब्बू आसवानी यांच्यामार्फत सदर पाण्याचा प्रश्न सोडविण्यात आला. रहिवाशी नागरिकांच्या मागणीवरून डब्बू आसवानी यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच महानगरपालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांना सतत पाठपुरावा करून सदर समस्या सोडविण्यावर भर देत या सर्व समस्या सोडविण्यासाठी त्यांना यश आले.रहिवाशी नागरिकांच्या मागणीवरून सोसायटीतील नागरिकांकरिता 3 नवीन पाण्याचे कनेक्शन जोडून देण्यात आले. यावेळी रहिवाशी नागरिकांनी समाधान व्यक्त केला. तसेच डब्बू आसवानी यांनी सोसायटी मधील जेष्ठ नागरिक यांच्या विविध प्रश्न जाणून घेऊन तसेच म्हाडा ग्रह निर्माण संस्था यांच्यामार्फत सदर सोसायटींना ज्या अपुऱ्या सोयी सुविधा पुरविण्यात आल्या, त्याबाबत देखील आपण अजित पवार यांच्याशी चर्चा केली असून लवकरात लवकर या सर्व समस्या मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार असल्याचे डब्बू आसवानी यांनी सांगितले.

सोसायटीतील रहिमान सुधारण्यासाठी आवश्यक त्या सुविधा तातडीने पुरवण्यासाठी प्रयत्नशील असून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा करून शहरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर आपण भर देणार असल्याचे ही डब्बू आसवानी यांनी सांगितले.

स्थानिक रहिवाशांची पाण्याची समस्या सोडवून दिली असल्याने सोसायटीमध्ये नागरिकांनी आनंद व्यक्त करत डब्बू आसवानी यांचे आभार व्यक्त केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 25/11/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# कुदळवाडी परिसरातील मतदार स्थळपाहणीबाबत हरकत!

## आमदार महेश लांडगे यांची महापालिका आयुक्तांना निवेदन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या भोसरी विधानसभा मतदार संघातील प्रारुप मतदार यादीत कुदळवाडी व परिसर प्रभाग क्रमांक 2 आणि 11 मध्ये झालेल्या स्थळपाहणीबाबत आमदार महेश लांडगे यांनी हरकत नोंदवली आहे. याबाबत महापालिका प्रभारी आयुक्त श्रावण हर्डिकर यांना लेखी निवेदन दिले आहे. तसेच, स्थळपाहणी अहवालाबाबत प्रश्नही उपस्थित केले आहेत.**




आमदार महेश लांडगे यांनी प्रशासनाला दिलेल्या अर्जामध्ये म्हटले आहे की, महानगरपालिकेने फेब्रुवारी 2025 मध्ये कुदळवाडी परिसरात सुमारे 827 एकर क्षेत्रावर अनधिकृत अतिक्रमणावरील कारवाई केली होती. 8 ते 17 फेब्रुवारी दरम्यान एकूण 4 हजार 111 अतिक्रमण हटवण्यात आले, ज्यामध्ये 3 कोटी 60 लाख 58 हजार 746 चौ.फुट क्षेत्र अवैध अतिक्रमणमुक्त करण्यात आले. "या भागातील जमीनदोस्त केलेल्या मिळकतींवर पूर्वी राहणाऱ्या मतदारांचा उल्लेख स्थळपाहणी अहवालात केला आहे का? किंवा याबाबत कोणतेही अद्ययावत दाखले प्रारुप मतदार यादीमध्ये दिसत नाहीत. त्यामुळे या भागातील काही मतदार स्थलांतरीत झाले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे."आमदार लांडगे यांनी प्रशासनाला प्रभाग क्रमांक 2 आणि 11 मधील कुदळवाडी अतिक्रमण कारवाई केलेल्या भागात पुनः स्थळपाहणी करून वस्तुनिष्ठ अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवण्याची विनंती केली आहे.आमदार लांडगे यांनी मांडलेल्या आकडेवारीतून दिसते की: प्रभाग क्रमांक 2 मधील 170, 171, 172 यादी भागांमध्ये 2024 मध्ये 4,048 मतदार होते. प्रारुप यादीमध्ये 4,078 मतदारांची नोंद आहे, परंतु योग्य स्थळ निरीक्षण केल्यास फक्त 650 मतदार राहण्याची अपेक्षा आहे. प्रभाग क्रमांक 11 मधील 62 ते 67 यादी भागांमध्ये 2024 मध्ये 8,536 मतदार होते, तर प्रारुप यादीमध्ये 8,350 मतदार आहेत; योग्य स्थळ निरीक्षण केल्यास अंदाजे 2,500 मतदार राहण्याची शक्यता आहे.

> "महानगरपालिका प्रशासनाने जर स्थळपाहणी केली असेल आणि अहवाल तयार केला असेल, तरी त्यात स्थलांतरीत मतदारांचा उल्लेख झालेला दिसत नाही. ही बाब निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेसाठी चिंताजनक आहे. राज्य निवडणूक आयोगाकडे ही हरकत नोंदवण्याची सूचना महापालिका प्रशासनाला केली असून, लवकरात लवकर योग्य पद्धतीने कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.-"
>
> **महेश लांडगे,**
> आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# देवत्वाची प्रचिती साहित्यातून येते! - डॉ.न.म.जोशी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी :'देव अस्तित्वात आहे की नाही याविषयी मतभेद होऊ शकतात; पण देवत्वाची प्रचिती साहित्यातून येते!' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. न. म. जोशी यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर साहित्यनगरी, जयगणेश बँक्वेट हॉल, नवीन देहू - आळंदी रस्ता, मोशी येथे रविवार, दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी केले. इंद्रायणी साहित्य परिषद आयोजित चौथ्या इंद्रायणी साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना डॉ. न. म. जोशी बोलत होते.**




संमेलनाध्यक्षा डॉ. सीमा काळभोर, आकाशवाणी पुणेचे निवृत्त संचालक गोपाळ अवटी, संतसाहित्याचे अभ्यासक ह. भ. प. उमेशमहाराज बागडे, मोई येथील इंद्रायणी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब गवारे, माजी संमेलनाध्यक्ष दादाभाऊ गावडे, स्वागताध्यक्ष नीलेश बोराटे, इंद्रायणी साहित्य परिषदेचे संस्थापक अरुण बोऱ्हाडे, परिषदेचे अध्यक्ष संदीप तापकीर यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.डॉ.न.म.जोशी पुढे म्हणाले की, 'आजच्या भ्रष्ट सामाजिक वातावरणाच्या पार्श्वभूमीवर मूल्यविवेक जागृत करणारे हे इंद्रायणी साहित्य संमेलन आहे. मोठ्यांनी लहानांच्या पाठीशी असावे ही आपल्या संस्कृतीची शिकवण आहे अन् याचा प्रत्यय या ग्रंथदिंडीतील बालवारकरी आणि त्यांच्या पाठीमागे चालणारे मान्यवर या दृश्यातून आला. साहित्याने प्रबोधन करू नये, असे समीक्षकांचे मत असले तरी साहित्याने उद्बोधनाचा आनंद द्यावा, याविषयी दुमत नाही. इंद्रायणी साहित्य संमेलन ही उद्बोधनाची यात्रा आहे!' बोधकथा, दृष्टान्त आणि कुसुमाग्रज यांचे संदर्भ उद्धृत करीत जोशी यांनी प्रतिपादन केले. संमेलनाध्यक्षा डॉ. सीमा काळभोर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून, 'मराठी भाषा हा मानवतेचा वारसा आहे!' असे प्रतिपादन करीत म्हणाल्या की, 'संत मांदियाळीने मराठीला लोकभाषा नव्हेतर अभिजात भाषा बनवली आहे. तो दर्जा अबाधित ठेवणे हे आपले आद्यकर्तव्य आहे. भजन, कीर्तन, तमाशा, लोकनाट्य यांसह सर्व लोककला आपल्या लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग आहे.

हीच लोकसंस्कृती महाराष्ट्राचा आत्मा आहे. अहिल्यादेवी या लोकाभिमुख शासक होत्या, त्यांच्या नावाच्या साहित्यनगरीत आपण वाचनसंस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे!' याप्रसंगी 'संवेदनांची साद' या अध्यक्षीय भाषणाची पुस्तिका प्रकाशित करून वितरित करण्यात आली.

त्याचबरोबर डॉ. पौर्णिमा कोल्हे संपादित 'अरुण बोऱ्हाडे यांची अक्षरवारी' या ग्रंथाचे मान्यवरांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले.

# महानगरपालिका साकारतेय टाकाऊतून नवनिर्मिती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड शहरात स्वच्छता आणि सौंदर्यनिर्मिती यांचा सुंदर मिलाफ अनुभवायला मिळत आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाने 'टाकाऊ वस्तूंपासून सर्जनशीलता' या संकल्पनेला नवचैतन्य देत, शहरातील टाकाऊ वस्तूंमधून आकर्षक कलाकृती निर्मितीचा उपक्रम मोठ्या उत्साहात राबवला आहे. या कलाकृती केवळ नजरेत भरणाऱ्या नसून पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छता उपक्रमास देखील चालना देणाऱ्या ठरत आहेत.**




शहरातील विविध कचरा संवेदनशील ठिकाणी हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आला आहे. यामध्ये ब क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग १७ बिजलीनगर, प्रभाग २२ शांती चौक काळेवाडी तसेच , इ क्षेत्रीय कार्यालयातील प्रभाग ०५ सखुबाई गवळी उद्यान, आळंदी रोड, भोसरी येथे असलेली संवेदनशील ठिकाणे आता रंगतदार, देखण्या कलाकृतींनी सुशोभित झाली आहेत.पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सफाई सेवकांनी केवळ स्वच्छता न करता, टाकाऊ टायर, प्लास्टिकचे डबे, बाटल्या, लोखंडी फ्रेम्स, पाइप्स यांसारख्या वस्तूंचा कल्पकतेने उपयोग करून उद्याने, रस्त्याकडील जागा आणि सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण केले. त्यांच्या कल्पकता आणि मेहनतीमुळे शहरात सौंदर्याची नवी उधळण झाली आहे.या उपक्रमासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, आरोग्य विभाग प्रमुख व उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, आरोग्य कार्यकारी अधिकारी व सहायक आयुक्त अमित पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आरोग्य अधिकारी राजेश भाट, सुधीर वाघमारे, श्रीराम गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक अतुल सोनवणे, भूषण शिंदे, आरोग्य निरीक्षक रूपाली साळवे, मुकेश जगताप आणि विकास शिरवाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

टाकाऊ वस्तूंचा सर्जनशील वापर केल्यास सुंदर परिवर्तन घडवता येते हे आरोग्य विभागाने आपल्या कृतीतून सहज दाखवून दिले आहे.या मोहिमेला नागरिकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नागरिकांच्या अशा सहभागामुळे शहरात 'स्वच्छतेतून सौंदर्य' असा सकारात्मक बदल दिसून येत आहे.पिंपरी चिंचवड महापालिकेची ही कलात्मक मोहीम इतर शहरांसाठीही प्रेरणादायी ठरत असून पुढील काळात अशाच अनेक सुशोभीकरण प्रकल्पांचे नियोजन सुरू आहे. टाकाऊ वस्तूंच्या कल्पक वापरातून पिंपरी चिंचवड शहर स्वच्छता आणि सौंदर्याचा नवा आदर्श निर्माण करत आहे.

# अभिनेते धर्मेंद्र यांचे दु:खद निधन !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बॉलीवूड अभिनेते धर्मेंद्र काही दिवसांपासून त्यांच्या चिंताजनक प्रकृतीमुळे चर्चेत होते. ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यानंतर काही दिवसांपूर्वीच त्यांना घरी आणण्यात आलं. अखेर २४ नोव्हेंबर रोजी त्यांनी ८९ व्या वर्षी त्यांच्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला.



धर्मेंद्र यांनी अभिनयाचा कोणताही वारसा नसताना स्वबळावर इंडस्ट्रीत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. ३०० हून अधिक चित्रपटांत काम करीत तब्बल सहा दशकं त्यांनी प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. त्यामुळे त्यांच्या जाण्यानं भारतीय चित्रपटसृष्टीत मोठी पोकळी निर्माण झाली आहे.धर्मेंद्र मूळचे पंजाबचे; पण सिनेमामध्ये काम करण्याचं त्यांचं स्वप्न होतं. एका मासिकाच्या कॉँटेस्टंटसाठी ते मुंबईत आले होते. पण, कलाकार म्हटलं की, संघर्ष हा चुकत नाही. धर्मेंद्र यांनाही सुरुवातीच्या काळात संघर्ष करावा लागला. मुंबईत पोटापाण्याची सोय व्हावी यासाठी त्यांनी सुरुवातीच्या काळात अनेक छोटी-मोठी कामंही केली आहेत.१९६० मध्ये धर्मेंद्र यांनी 'दिल भी तेरा हम भी तेरे' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर काही वर्षांनी ते 'बांदनी', 'हकीकत' आणि इतर काही चित्रपटांत झळकले. हळूहळू विविध भूमिका साकारत ते हिंदी चित्रपटसृष्टीतील स्टार बनले.

त्यानंतर धर्मेंद्र यांनी कधीच मागे वळून पाहिलं नाही. सुरुवातीला धर्मेंद्र एकटेच मुंबईत राहत होते; पण यशस्वी झाल्यानंतर त्यांनी घर खरेदी केलं आणि त्यांच्या आई-वडिलांना व पहिल्या पत्नी प्रकाश कौर यांना मुंबईत बोलावून घेतलं.

धर्मेंद्र काही दिवसांपासून आजारी होते. ऑक्टोबर महिन्यात त्यांची प्रकृती बिघडली होती आणि त्यानंतर नोव्हेंबरमध्ये प्रकृती चिंताजनक झाली.पण, नंतर त्यांच्या प्रकृतीत थोडी सुधारणा झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांना घरी घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. त्यांचे कुटुंबीय आणि चाहते त्यांच्या प्रकृतीसाठी प्रार्थना करीत होते; पण आज (२४ नोव्हेंबर) त्यांनी जगाचा निरोप घेतला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968




अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734